# शिक्षणाचे रचनावादी शास्त्र

**• Classrooms have failed in educating students;**

Let's get rid of them.

- विद्यार्थी वातावरणातून ज्ञान शोषून घेतात; त्यामुळे ज्या विषयाचे ज्ञान घ्यायचे त्याचे वातावरण भोवती असणे किंवा निर्माण करणे फायद्याचे ठरते.

अर्थाचा शोध घेणे ही विद्यार्थ्यांची नैसर्गिक प्रवृत्ती असते; भोवती प्रश्न पेरा, विद्यार्थी उत्तरे खोदून काढतील.

जेव्हा अर्थाचा शोध घेण्याची आव्हाने समोर ठाकतात तेव्हा विद्यार्थी विचार करायला शिकतात.

- शालेय जीवनात, मैदानी खेळ हा बौद्धिक कामांचा आधार असतो.

- उत्तम भाषेत बोलता येणे हाच व्यक्तिमत्व विकासाचा पाया असतो.

- खूप बोलायला मिळणे आणि खूप ऐकायला मिळणे हाच

भाषा शिक्षणाचा सर्वोकृष्ट मार्ग असतो.

- जेव्हा विद्यार्थी अनुभवांनी समृद्ध होतात तेव्हा लिहीत जाणे

हा त्यांचा स्वभावधर्मच होतो.

- विद्यार्थ्यांच्या भोवती ग्रंथ अंथरुन ठेवले तर विद्यार्थी त्यांना स्पर्श करतील; स्पर्शातून प्रेम निर्माण होईल नि विद्यार्थी वाचनाकडे वळतील.

विद्यार्थ्यांना शिकायला आवडते; शिकवून घ्यायला फारसे आवडत नाही. म्हणून शाळांतून शिकविण्यापेक्षा शिकण्याचे काम अधिक व्हावे.

- आपणहून शिकणे, करुन शिकणे आणि अनुभवांतून शिकणे

यांतून कायम टिकणारे शिक्षण होते.

❖